# लसीकरण तीन दिवस बंद



लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** करोनावरील लशींचा साठा संपल्याने मुंबईतील लसीकरण तीन दिवस बंद राहणार आहे. लससाठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नसल्याने दैनंदिन लसीकरण मोहिमेचे काटेकोर नियोजन करूनही पालिके ला अडचणींचा सामना करावा लागतो आहे. त्यामुळे शुक्रवार, ३० एप्रिल ते रविवार, २ मे २०२१ असे तीन दिवस मुंबईतील लसीकरण पूर्णपणे बंद राहणार आहे. तसेच १ मेपासून नियोजित १८ ते ४४ वर्षे वयोगटातील नागरिकांचे लसीकरण पुरेशा लससाठ्याअभावी पुढे ढकलले जाण्याची शक्यताही पालिका प्रशासनाने व्यक्त केली आहे.

मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या आणि शासकीय रुग्णालयांमध्ये मिळून ६३ लसीकरण केंद्रांवर तर खासगी रुग्णालयांत ७३ लसीकरण केंद्रांवर करोना प्रतिबंधक लस दिली जात आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून लससाठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नसल्याने दररोज परिस्थितीचा आढावा घेऊन दैनंदिन लसीकरण मोहिमेचे नियोजन प्रशासन करीत आहे. त्याबाबतची माहिती प्रसारमाध्यमे आणि सामाजिक माध्यमांतून सातत्याने नागरिकांपर्यंत पोहोचवली जाते आहे.

वय वर्षे १८ ते ४४ वर्षे वयोगटातील लसीकरण सुरू झाल्याने आपल्याला लस मिळणार नाही, असा गैरसमज ४५ वर्षे व त्यापेक्षा अधिक वयोगटातील नागरिकांनी बाळगू नये. लसीकरणाची व्याप्ती वाढली तरी ४५ वर्षे व त्यावरील वयाच्या नागरिकांना प्राधान्याने लस देण्यात येईल, असेही पालिकेतर्फे सांगण्यात आले आहे.

**खात्रीपूर्वक लस मिळणार!**

४५ वर्षे व अधिक वयोगटातील सर्व नागरिकांना खात्रीपूर्वक लस मिळेल, असे आश्वासन पालिका प्रशासनाने दिले आहे. नागरिकांनी मनात संभ्रम ठेवू नये. लससाठा उपलब्ध होताच प्राधान्याने त्यांचे लसीकरण करण्यात येईल. त्यामुळे चिंताग्रस्त होऊन लसीकरण केंद्रांवर गर्दी करू नये, असे आवाहनही करण्यात आले आहे. या दरम्यानच्या कालावधीत, महानगरपालिकेला लससाठा प्राप्त झाला व लसीकरण सुरू होणार असेल तर त्याची माहिती प्रसारमाध्यमे व समाजमाध्यमांतून मुंबईकरांपर्यंत पोहोचविण्यात येईल. नोंदणीकृत पात्र व्यक्तींनाच आता लस दिली जाणार आहे.

### पालिकेचे आवाहन

- लस देताना दुसरी मात्रा घेणाऱ्यांना प्राधान्य असेल.
- लसीकरणासाठी सर्व पात्र नागरिकांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी केलेली असेल तरच लस देण्यात येईल.
- ज्येष्ठ नागरिकांना व गरजूंना लसीकरणाची नोंदणी करण्यासाठी साहाय्य करावे, म्हणून वेगवेगळ्या अशासकीय संस्था, व्यक्ती यांना महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने यापूर्वीही आवाहन करण्यात आले आहे.
- लशीची पहिली मात्रा (डोस) घेतलेल्या नागरिकांनीदेखील चिंताग्रस्त होऊ नये. प्रथम मात्रा घेतल्यानंतर शरीरात पुरेशी प्रतिपिंडे (ॲण्टिबॉडीज) निर्माण होतात. त्यामुळे काही कारणाने दुसरी मात्रा घेण्यास थोडासा विलंब झाला तरी काळजी करू नये.

### ‘दोन मुखपट्ट्या लावून या!’

लससाठा उपलब्ध झाल्यानंतर, लसीकरणासाठी ४५ वर्षे व त्यापेक्षा अधिक वयोगटाच्या नागरिकांनी केंद्रांवर रांगेत उभे राहून गर्दी करू नये. गर्दी केल्याने संसर्ग फैलावण्याचा धोका वाढतो, ही बाब सर्वांनी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. तसेच लसीकरण केंद्रांवर येताना आणि वावरताना एकावर एक अशा दोन मुखपट्ट्या लावून यावे, असेही आवाहन केले आहे.

## नाटककार शेखर ताम्हाणे यांचे निधन

**मुंबई :** ‘सविता दामोदर परांजपे’ या गाजलेल्या नाटकाचे लेखक शेखर ताम्हाणे यांचे बुधवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास करोनाने निधन झाले. ते ६८ वर्षांचे होते. करोनाबाधित झाल्यानंतर त्यांना ठाणे येथील ज्युपिटर रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र त्यांची प्रकृती अधिकच ढासळली. गेल्या पाच दिवसांपासून त्यांना जीवरक्षक प्रणालीवर ठेवण्यात आले होते. त्यांच्या पत्नी उमा ताम्हाणे यांचेही १९ एप्रिलला करोनाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी आणि त्यांचे कुटुंब असा परिवार आहे. नाटककार-अभिनेते राजन ताम्हाणे यांचे ते भाऊ होत.



‘सविता दामोदर परांजपे’ या गाजलेल्या नाटकाचे लेखन-निर्मिती शेखर यांनी केली होती. त्यांचे ‘तू फक्त हो म्हण’ हे नाटकही गाजले होते. ‘तिन्ही सांज’ हे नाटक अलीकडेच प्रदर्शित झाले होते, यात काही वेगळे तंत्रप्रयोगही त्यांनी केले होते.

# ४१९२ नवे रुग्ण, ८२ मृत्यू

## रुग्णवाढीच्या दरांत घट, तर मृतांच्या संख्येत वाढ

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबईतील दैनंदिन रुग्णसंख्या कमी झालेली असली तरी दैनंदिन मृतांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली आहे. गुरुवारी दिवसभरात ८२ रुग्णांचा मृत्यू झाला तर ४,१९२ नव्या रुग्णांची नोंद झाली. मात्र चाचण्यांच्या तुलनेत बाधितांचे प्रमाणही घटू लागले असून गुरुवारी हे प्रमाण १०.७९ टक्के झाले आहे.

मुंबईत गुरुवारी ४ हजार १९२ नव्या रुग्णांची नोंद झाल्यामुळे एकूण बाधितांची संख्या ६ लाख ४४ हजार झाली आहे. एका दिवसात नव्या रुग्णांपेक्षा जास्त म्हणजे ५ हजार ६५० रुग्ण बरे झाल्यामुळे आतापर्यंत ५ लाख ६६ हजारांहून अधिक म्हणजेच ८८ टक्के रुग्ण करोनामुक्त झाले आहेत. करोनामुक्त रुग्णांची संख्या फेब्रुवारीत ९४ टक्क्यांवर होती; मात्र रुग्णसंख्या वाढू लागल्यामुळे हा दर ७९ टक्क्यांपर्यंत कमी झाला होता. आता हा दर वाढून ८८ टक्के झाला आहे. मुंबईतील उपचाराधीन रुग्णांची संख्याही आता कमी होऊ लागली आहे. ही संख्या ९२ हजारांपुढे गेली होती. ती आता ६४ हजार ०१८ झाली आहे. त्यापैकी ७३ टक्के म्हणजेच ४७ हजार रुग्णांना कोणतीही लक्षणे नाहीत, तर २५ टक्के म्हणजेच १६ हजारांहून अधिक रुग्णांना लक्षणे आहेत. गंभीर रुग्णांची संख्या १ हजार ४४२ झाली आहे.

करोनाचे रुग्ण वाढत असल्यामुळे मुंबईतील चाचण्यांचे प्रमाणही वाढवण्यात आले आहे. दर दिवशी ४५ ते ५० हजार चाचण्या केल्या जातात. मात्र चाचण्यांचे प्रमाण गेल्या काही दिवसांपासून कमी झाले आहे. बुधवारी ३८,८४८ चाचण्या करण्यात आल्या. त्यापैकी १०.७९ टक्के नागरिक बाधित आढळले. एकूण चाचण्यांपैकी १४,७०० प्रतिजन चाचण्या होत्या. त्यापैकी ५ टक्के बाधित होते. तर २४,२०० आरटीपीसीआर चाचण्या होत्या. त्यातील १५ टक्के बाधित होते. आतापर्यंत ५३ लाखांहून अधिक चाचण्या करण्यात आल्या आहेत.

**मृतांची संख्या १३ हजारांपुढे**

मृतांची संख्या मात्र वाढत असून गुरुवारी ८२ रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली असून त्यात ४३ पुरुष व ३९ महिलांचा समावेश आहे. ५१ मृतांचे वय ६० वर्षांवरील होते. तर ५७ रुग्णांना दीर्घकालीन आजार होते. २८ रुग्ण ४० ते ६० वयोगटातील होते. ३ मृतांचे वय ४० वर्षांखालील होते. मृतांची एकूण संख्या १३ हजार ०७२ झाली आहे.

### ठाणे जिल्ह्यात ३,३८४ रुग्ण

ठाणे जिल्ह्यात गुरुवारी ३,३८४ करोना रुग्ण आढळून आले. तर ६० जणांचा करोनामुळे मृत्यू झाला. ठाणे महापालिका क्षेत्रात ८६३, कल्याण-डोंबिवली ८३५, नवी मुंबई ५०१, मीरा-भाईंदर ४४३, ठाणे ग्रामीण ३०८, बदलापूर १५२, उल्हासनगर १३१, अंबरनाथ १२५ आणि भिवंडीत २६ रुग्ण आढळून आले. ६० मृतांपैकी ठाणे १३, नवी मुंबई १२, कल्याण-डोंबिवली दहा, मीरा-भाईंदर नऊ, ठाणे ग्रामीण सहा, अंबरनाथ पाच, उल्हासनगर तीन आणि बदलापूरमधील दोन रुग्णांचा सामावेश आहे.

## लोककलावंत शशिकांत खामकर कालवश

**मुंबई :** नाटक आणि लोककलेच्या माध्यमातून अभिनय आणि वाक्‌कौशल्याने लोकांना मनसोक्त हसवणारे ‘शाहिरी लोककला मंच’चे विनोदवीर शशिकांत खामकर यांचे बुधवारी करोनाने निधन झाले. ते ६२ वर्षांचे होते.

मुंबईत ८०च्या दशकात ‘शाहीर खामकर आणि मंडळी’च्या व्यासपीठावरून आपल्या विनोदी सादरीकणाचा आरंभ करणाऱ्या शशिकांत खामकर यांनी ‘हसवाफसवी’, ‘ती फुलराणी’, ‘अरेरे संसार संसार’ अशा व्यावसायिक नाटकातही विनोदी भूमिका केल्या आहेत. तसेच दूरदर्शन, तमाशे, वगनाट्य या माध्यमांतूनही त्यांनी आपली कला सादर केली. शाहीर मधू खामकर यांचे ते लहान बंधू होत. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, पत्नी असा परिवार आहे.

# मुंबईच्या आर्द्रतेत वाढ

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** वाढलेले किमान तापमान आणि स्थिर असलेले कमाल तापमान, इत्यादी कारणांमुळे गुरुवारी मुंबईच्या आर्द्रतेत ४ ते ५ टक्क्यांची वाढ झाली. त्यामुळे दिवसभर वातावरण ढगाळ होते.

गेल्या काही दिवसांपासून मुंबईसह कोकण किनारपट्टीत आर्द्रतेचे प्रमाण अधिक दिसत असून पावसाळी वातावरण आहे. काही ठिकाणी पावसाचा शिडकावाही झाला आहे. सोमवारपासून मुंबईच्या किमान तापमानात वाढ झाली असून बुधवारी आणि गुरुवारी किमान तापमानाचा पारा २७ अंश सेल्सिअसवर स्थिर राहिला; मात्र आर्द्रतेत वाढ झाली. बुधवारी सांताक्रूझ येथे ६६ टक्के आर्द्रता होती, ती वाढून गुरुवारी ७१ टक्क्यांपर्यंत गेली. कुलाबा येथे



बुधवारी ७६ टक्के आर्द्रतेची नोंद झाली होती. यात वाढ होऊन गुरुवारी ८१ टक्के इतकी आर्द्रता नोंदवली गेली.

मुंबईतील कमाल तापमानात फार मोठी वाढ झाली नाही. रत्नागिरी येथे मात्र घट दिसून आली. बुधवारी रत्नागिरी येथे ३६.६ अंश सेल्सिअस कमाल तापमान होते. गुरुवारी ते ३४.२ अंश सेल्सिअसपर्यंत घसरले. अलिबाग येथील कमाल तापमानातही घट झाली असून पारा ३५.१ अंशावरून ३३.१ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आला. दोन्ही ठिकाणी आर्द्रतेत २ ते ३ अंशांची घट दिसून आली.

# लसीकरणासाठी काँग्रेसच्या आमदारांकडून एक महिन्याचे वेतन

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यातील १८ ते ४४ वर्षे वयोगटातील नागरिकांना मोफत करोना प्रतिबंधक लस देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मात्र त्याचा मोठा आर्थिक भार राज्यावर पडणार आहे. त्यासाठी अल्पसा हातभार म्हणून काँग्रेस पक्षाचे सर्व आमदार आपले एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री साहाय्यता निधीला देणार आहेत. तर काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते व राज्याचे महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी त्यांचे एक वर्षाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीला देण्याचे जाहीर केले आहे.

राज्य सरकारने घेतलेल्या मोफत लसीकरणाच्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी हातभार लागावा यासाठी विधानसभा सदस्य म्हणून माझ्या एक वर्षाच्या वेतनाची आणि काँग्रेस पक्षाच्या विधानसभा आणि विधान परिषदेतील ५३ आमदारांच्या एका महिन्याच्या वेतनाची अशी एकूण जवळपास २ कोटी रुपयांची रक्कम, तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीच्या वतीने ५ लाख रुपये इतकी रक्कम मुख्यमंत्री साहाय्यता निधीत जमा करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे, असे थोरात यांनी सांगितले. तसेच अमृत उद्योग समूहातील सहकारी संस्थांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या लसीकरणाचा खर्च त्या सहकारी संस्था करणार आहेत. त्या खर्चाची रक्कमही मुख्यमंत्री साहाय्यता निधीत जमा करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष सत्यजीत तांबे यांनी जे नागरिक लसीकरणाचा खर्च स्वतः उचलू शकतात त्यांनी लशीची रक्कम मुख्यमंत्री साहाय्यता निधीत जमा करण्याचे आवाहन केले आहे.

TATA
टाटा पॉवर
दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : बॉम्बे हाऊस, २४, हार्मोनी मोदी स्ट्रीट, मुंबई-४०० ००१.
दूर. : ९१ २२ ६६६५ ८२८२; फॅक्स : ९१ २२ ६६६५ ८८०१ सीआयएन : एल२८९२०एमएच१९१९पीएलसी०००५६७
ई-मेल : tatapower@tatapower.com संकेतस्थळ : www.tatapower.com

सूचना

कर्जरोखे विश्वस्त करार दिनांकित जून २३, २०११च्या अनुषंगाने याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनी आणि कंपनी कायदा २०१३च्या कलम ९१द्वारे जारी करण्यात आलेले माहिती ज्ञापन पत्र दिनांकित जून १, २०११ असे की, कंपनीद्वारे अविमोचन योग्य कर्जरोखे (आयएसआयएन : आयएनई२४५ए०८०३४) असुरक्षित गौण शाश्वत मूल्यांकित सूचिबद्ध सुरक्षा जे खासगी व्यवस्था तत्त्वावर एकूण रु. १,५००/- कोटी जारी करण्यासाठी ११.४०% असुरक्षित निर्णय पर्यायाच्या अंमलबजावणीच्या अनुसार खालीलप्रमाणे वितरण/ व्याज प्रदान आणि ऋणमुक्ती प्रदान करण्यात येणार आहे :

| अ. क्र. | कर्जरोखे | वाटप/व्याज प्रदान आणि ऋणमुक्ती प्रदान रोजी देय | वितरण/ व्याज प्रदान आणि ऋणमुक्तीसाठी नोंद दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अविमोचन योग्य कर्जरोखे (आयएसआयएन : आयएनई२४५ए०८०३४) असुरक्षित गौण शाश्वत मूल्यांकित सूचिबद्ध सुरक्षा जे खासगी व्यवस्था तत्त्वावर एकूण रु. १,५००/- कोटी जारी करण्यासाठी ११.४०% असुरक्षित निर्णय पर्यायाच्या अंमलबजावणी | जून ०२, २०२१ | मे २८, २०२१* |

* नोंद दिनांक (मे ३०, २०२१) हा कामकाजाच्या दिवसांमध्ये येत नसल्याने माहिती ज्ञापन पत्राच्या अनुसार त्या दिवसाच्या ताबडतोब नंतर येणारा दिवस हा प्रभावी दिनांक म्हणून समजण्यात येईल.

कर्जरोखेधारक ज्यांची नावे लाभार्थी मालक म्हणून नोंद दिनांकाच्या अनुसार इलेक्ट्रॉनिक स्वरूपात धारण केलेल्या कर्जरोख्यांच्या संदर्भात डिपॉझिटरीजद्वारे देण्यात आलेल्या यादीमध्ये आहेत ते नमूद प्रदानासाठी उपरोक्त नमूद केल्यानुसार पात्र असतील.

दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेडकरिता
हनोझ मिस्त्री
कंपनी सचिव
एफसीएस क्र. ३६०६

ठिकाण : मुंबई
दिनांकित : २९ एप्रिल, २०२१

## ज्येष्ठ अभिनेते रणधीर कपूर यांना करोना

**मुंबई :** ज्येष्ठ अभिनेते रणधीर कपूर यांना करोनाची लागण झाली असून त्यांना उपचारासाठी अंधेरीतील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ७४ वर्षीय रणधीर कपूर यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याच्या वृत्ताला रुग्णालयाचे कार्यकारी संचालक डॉ. संतोष शेट्टी यांनी निवेदनाद्वारे दुजोरा दिला आहे. त्यांना श्वसनास त्रास होऊ लागल्याने बुधवारी रात्री रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या करोना चाचणीचा अहवाल गुरुवारी उपलब्ध झाला असून त्यांना करोनाची लागण झाली असल्याचे डॉ. शेट्टी यांनी स्पष्ट केले आहे. रणधीर यांची प्रकृती स्थिर असल्याची माहितीही त्यांनी दिली आहे.

NSE
National Stock Exchange of India Limited
CIN: U67120MH1992PLC069769
नोंदणीकृत कार्यालय: "एक्सचेंज प्लाझा", सी-१, ब्लॉक 'जी', बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१. टेली: +९१-२२-२६५९८२२२. फॅक्स: +९१-२२-२६५९८१९८
ईमेल: secretarialdept@nse.co.in वेबसाईट: www.nseindia.com

सूचना

कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक मंगळवार, दिनांक ११ मे, २०२१ रोजी आयोजित करण्यात आली आहे. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षासाठी कंपनीच्या वैधानिक लेखा परीक्षण केलेल्या आर्थिक निकालाचा विचार करण्यासाठी आणि मंजूर करण्यासाठी (स्वतंत्रपणे आणि एकत्रित दोन्हीही) व कंपनीच्या लेखापरीक्षण समितीने शिफारस केलेल्या सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी लाभांश, असल्यास व काही शिफारस करणे, यांसाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर माहिती कंपनीची वेबसाईट www.nseindia.com येथे ही उपलब्ध आहे.

नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडसाठी
रोहित गुप्ते
कंपनी सेक्रेटरी

दिनांक: ३० एप्रिल, २०२१
ठिकाण: मुंबई

सिडको
शहरांचे शिल्पकार

शुद्धिपत्रक क्र. २
निविदा क्रमांक: ०१/सिडको/मु.म.
(प.व वि)/प.अ.का.प्र.२/२०-२१
C.A. NO: 01/CIDCO/CGM(T&A)/TECP2/20-21

शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको) ई-निविदा प्रक्रियेद्वारे पुष्पक नोड, नवी मुंबई येथील चिर्ले बेलोंडेखार येथे एकात्मिक लॉजिस्टिक पार्क (आयएलपी) च्या विकासासाठी तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता अभ्यास करण्यासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनुभवी आणि प्रतिष्ठित सल्लागार संस्थांकडून तांत्रिक आणि आर्थिक विनंती प्रस्ताव (आरएफपी) मागविला आहे. निविदा प्रस्ताव दस्तऐवज शुध्दीपत्रक क्र. १ आणि शुध्दीपत्रक क्र. २ सिडकोच्या अधिकृत ई-निविदा वेबसाईटवर (www.mahatenders.gov.in) उपलब्ध आहेत.

प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख दि. ३१ मे २०२१ रोजी १७.०० वाजेर्यंत वाढविण्यात आली आहे.

मुख्य महाव्यवस्थापक
(परिवहन व विमानतळ),
सिडको महाराष्ट्र मर्यादित

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/००१(अ)/२०२०-२१

RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY, NAGPUR

EMPLOYMENT NOTICE

No. RTMNU/GA/159 Dated : 29th April, 2021

Applications are invited in prescribed format from eligible candidates for appointment to the following statutory posts in the University.

| Post Advt. No. | Name of the Post |
|---|---|
| D/FST/2021/1 | DEAN, Faculty of Science and Technology |
| D/FCM/2021/2 | DEAN, Faculty of Commerce & Management |
| D/FH/2021/3 | DEAN, Faculty of Humanities |
| D/FIDS/2021/4 | DEAN, Faculty of Inter-disciplinary Studies |
| D/LIB/2021/5 | DIRECTOR, Knowledge Resource Centre |
| REG/2021/6 | REGISTRAR (This is a re-advertisement. The candidates who have earlier applied for the post of REGISTRAR against Advertisement No. RTMNU/GA/978 published on 12th September, 2019 need not apply again. However, they can submit the revised Bio-data with changes, if any) |

Applicants shall apply in the prescribed Application form of this University which is available on the website of the University www.nagpuruniversity.ac.in alongwith all the required information.

Last date of submission of Application form alongwith self attested true copies of the relevant enclosures in **NINE SETS** is 21st May, 2021

Registrar

TATA
TATA STEEL LIMITED
Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001, India
Tel.: +91 22 6665 8282 Email: cosec@tatasteel.com
Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

सूचना

टाटा स्टील लिमिटेड (‘कंपनी’) च्या संचालक मंडळाची एक बैठक बुधवार, ५ मे, २०२१ रोजी इतर गोष्टींसह पुढील कामकाज करण्यासाठी होणार आहे.

१. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी लेखापरीक्षित अलिप्त आणि अलेखापरिक्षित एकत्रित वित्तीय विवरणे आणि निष्कर्ष विचारात घेऊन अभिलिखित करणे;
२. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षासाठी लेखापरिक्षित अलिप्त आणि एकत्रित वित्तीय विवरणे आणि निष्कर्ष विचारात घेऊन अभिलिखित करणे; आणि
३. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षासाठी देय असल्यास लाभांशाची शिफारस करणे.

सदर सूचना आणि वित्तीय निष्कर्ष कंपनीची वेबसाईट www.tatasteel.com वर तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड ची www.nseindia.com आणि बीएसई लिमिटेडची www.bseindia.com ह्या वेबसाईटस् वर सुद्धा उपलब्ध करून दिले जातील.

टाटा स्टील लिमिटेड
सही/-
पार्वथीसम कांचिनाधम
कंपनी सेक्रेटरी अँड
चिफ लिगल ऑफिसर (कॉर्पोरेट अँड कॉम्प्लायन्स)

२८ एप्रिल, २०२१
मुंबई

TATA STEEL



## जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, माझे अशील हे सर्व भारमुक्त येथील खालील लिहिलेल्या परिशिष्टात उल्लेखलेला परिसर **(१) हरिष परमानंद वरंदानी आणि (२) जया हरिष वरंदानी** यांच्याकडुन खरेदी करण्यासाठी वाटाघाटी करित आहेत.

सर्व व्यक्ती ज्यांचा विक्री, अदलाबदल, गहाण, प्रभार, बक्षीस, विश्वस्त, म्युनिमेंट, वारसाहक्क, कब्जा, भाडेपट्टा, धारणाधिकार, देखभाल, सुविधाधिकार, भार किंवा अन्यथा कोणत्याही मार्गाने परिसराच्या संदर्भात कोणताही हक्क, नामाधिकार, हितसंबंध, दावा किंवा मागणी असल्यास सदर प्रसिध्दी तारखेपासून १४ दिवसात निम्नस्वाक्षरीकारांना त्यांचे कार्यालय १०१/१०२, दरवेश चेंबर्स, पी.डी. हिंदुजा रोड, आणि एस.व्ही. रोडचे जंक्शन, खार (पश्चिम), मुंबई-४०००५२ येथे एसपीएडी/आरपीएडी (त्या पुष्ठ्यर्थ कागदोपत्री पुराव्यांच्या स्वसाक्षांकित प्रतींसह एकत्रित) लेखी स्वरुपात कळविण्याची याद्वारे विनंती करण्यात येत आहे, कसूर केल्यास हातातील प्रकरण हे कोणताही हक्क, नामाधिकाराच्या कोणत्याही संदर्भाशिवाय पूर्ण करण्यात येईल आणि दावा काही असल्यास सूचनेसह त्यागित आणि/किंवा परित्यागित केल्याचे मानण्यात येईल.

**परिशिष्ट**

**दि डायमंड क्वीन प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड** (''सोसायटी'') द्वारे जारी केलेल्या शेअर प्रमाणपत्र क्र. ४ द्वारे एकूण रु. २५०/- मधील सर्व प्रत्येकी रु. ५०/- च्या मुल्याचे क्र. १६ ते २० (दोन्ही मिळुन) धारक सर्व ते पाच पूर्ण भरणा झालेले शेअर्स आणि त्याच्याशी अनुषंगिक मुंबई उपनगर आणि अंधेरी वांद्रेच्या जिल्हा आणि उपजिल्हा नोंदणीतील वेस्ट ॲव्हेन्यू, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई ४०००५४ येथे स्थित, वसलेल्या आणि अशा सिटी सर्व्हे वांद्रे, तालुका अंधेरी एमएसडी चा क्र. ४७-बी, संलग्न सीटीएस क्र. जी/४५७, ''जी'' वॉर्ड धारक प्लॉटवर उभ्या सोसायटीच्या मालकीच्या **डायमंड क्वीन** अशा ज्ञात इमारती मधील २ ऱ्या मजल्यावरील मोजमापित ७१ चौ.मी. चटई क्षेत्र म्हणजेच ८५.२ चौ.मी. बिल्टअप क्षेत्र **क्र. २२ धारक फ्लॅट.**

सदर दिनांक ३० एप्रिल, २०२१

आर.एस. वासवदा
वकील, उच्च न्यायालय.

---

**HDFC CREDILA** — The Education Loan Specialist

## HDFC CREDILA FINANCIAL SERVICES LIMITED

(formerly known as HDFC Credila Financial Services Private Limited)
(CIN: U67190MH2006PLC159411)
**Regd. Office:** B-301, Citi Point, Andheri-Kurla Road, Andheri (East), Mumbai 400 059
**Tel No:** 02228266636 | **Website:** www.hdfccredila.com
**Email:** investor@hdfccredila.com

### FINANCIAL RESULTS FOR THE YEAR ENDED 31 MARCH 2021

(₹ in Lakhs)

| Sr. No. | Particulars | Year ended 31 March 2021 | Year ended 31 March 2020 |
|---|---|---|---|
| | | Audited | Audited |
| 1 | Total income from operations | 71,346.55 | 72,658.29 |
| 2 | Net profit for the period (before tax, exceptional and/or extraordinary items) | 20,777.74 | 16,926.52 |
| 3 | Net profit for the period before tax (after exceptional and/or extraordinary items) | 20,777.74 | 16,926.52 |
| 4 | Net profit for the period after tax (after exceptional and/or extraordinary items) | 15,522.83 | 12,310.13 |
| 5 | Total Comprehensive income for the period | 15,783.34 | 10,625.82 |
| 6 | Paid up equity share capital | 13,179.82 | 13,179.82 |
| 7 | Other equity (excluding revaluation reserve) | 101,249.80 | 85,466.46 |
| 8 | Net worth | 114,429.62 | 98,646.28 |
| 9 | Paid up debt capital/outstanding debt | 527,060.34 | 585,843.60 |
| 10 | Debt equity ratio | 4.7 | 6.0 |
| 11 | Earnings per share (of ₹ 10/- each) | | |
| | 1. Basic: | 11.78 | 14.18 |
| | 2. Diluted: | 11.78 | 14.18 |

**Notes:**

1) The financial results of the Company have been prepared in accordance with Indian Accounting Standards ('Ind AS') notified under the Companies (Indian Accounting Standards) Rules, 2015 as amended from time to time and the other accounting principles generally accepted in India.

2) The above is an extract of the detailed yearly financial results filed with BSE Limited under Regulation 52 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the financial results are available on www.bseindia.com and www.hdfccredila.com.

3) For the items referred in sub-clauses (a), (b), (d) and (e) of the Regulation 52 (4) of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015, the pertinent disclosures have been made to BSE and can be accessed on www.bseindia.com and www.hdfccredila.com.

For and on behalf of Board of Directors
**HDFC Credila Financial Services Limited**
(formerly known as HDFC Credila Financial Services Private Limited)

**Arijit Sanyal**
*Managing Director & CEO*
**(DIN: 08386684)**

**Date:** 29 April 2021

---

**L&T Finance Holdings Limited**
**Registered Office**
Brindavan, Plot No. 177, C.S.T Road
Kalina, Santacruz (East)
Mumbai 400 098, Maharashtra, India
CIN: L67120MH2008PLC181833

**T** +91 22 6212 5000
**F** +91 22 6212 5553
**E** igrc@ltfs.com
www.ltfs.com

**L&T Finance Holdings**

### EXTRACT OF CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND YEAR ENDED MARCH 31, 2021

(₹ in **Crore**)

| Particulars | Quarter ended March 31, 2021 (Unaudited) | Year ended March 31, 2021 (Audited) | Quarter ended March 31, 2020 (Unaudited) |
|---|---|---|---|
| 1 Total income from operations | 3,587.18 | 14,080.10 | 3,425.68 |
| 2 Net profit for the period/year (before tax, exceptional and/or extraordinary items) | 718.24 | 1,269.59 | 455.94 |
| 3 Net profit for the period/year before tax (after exceptional and/or extraordinary items) | 718.24 | 1,495.20 | 455.94 |
| 4 Net profit for the period/year after tax (after exceptional and/or extraordinary items) attributable to owners of the Company | 266.85 | 970.94 | 386.15 |
| 5 Total comprehensive income for the period/year attributable to owners of the Company | 243.66 | 1,013.87 | 270.03 |
| 6 Paid up equity share capital (face value of ₹ 10 each) | 2,469.45 | 2,469.45 | 2,004.83 |
| 7 Other equity | | 16,303.75 | |
| 8 Earnings per share (*not annualised) | | | |
| (a) Basic (₹) | * 1.18 | 4.49 | * 1.82 |
| (b) Diluted (₹) | * 1.17 | 4.47 | * 1.81 |

**Notes:**

1. The Company reports quarterly financial results of the group on a consolidated basis, pursuant to Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("Listing Regulations") as amended read with circular dated July 5, 2016. The standalone financial results are available on the website of the Company at www.ltfs.com, the website of BSE Limited ("BSE") at www.bseindia.com and on the website of National Stock Exchange of India Limited ("NSE") at www.nseindia.com. The specified items of the standalone financial results of the Company for the quarter and year ended March 31, 2021 and quarter ended March 31, 2020 are given below.

(₹ in **Crore**)

| Particulars | Quarter ended March 31, 2021 (Unaudited) | Year ended March 31, 2021 (Audited) | Quarter ended March 31, 2020 (Unaudited) |
|---|---|---|---|
| Total income | 125.12 | 191.42 | 412.75 |
| Profit before tax | 79.08 | 188.79 | 341.69 |
| Profit after tax | 58.87 | 116.05 | 339.81 |
| Total comprehensive income | 58.85 | 116.16 | 339.79 |

2. The above is an extract of the detailed format of audited consolidated financial results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the Listing Regulations.
3. These consolidated financial results have been prepared in accordance with the recognition and measurement principles of Indian Accounting Standard ("Ind AS") prescribed under section 133 of the Companies Act 2013 (the "Act") read with relevant rules issued thereunder and the other accounting principles generally accepted in India.
4. These consolidated financials results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at its meeting held on April 29, 2021. The Joint Statutory Auditors of the Company have carried out audit of the aforesaid results.

**For and on behalf of the Board of Directors**
**L&T Finance Holdings Limited**

**Place:** Mumbai
**Date:** April 29, 2021

**Dinanath Dubhashi**
**Managing Director & Chief Executive Officer**
**(DIN: 03545900)**

---

**RELIANCE HOME FINANCE** — A RELIANCE CAPITAL COMPANY

**Notice**

NOTICE, pursuant to Regulation 47 read with Regulation 29 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, is hereby given that a meeting of the Board of Directors of the Company will be held on Friday, May 7, 2021, *inter-alia*, to consider and approve Company's Audited Financial Results for the quarter and financial year ended March 31, 2021.

For **Reliance Home Finance Limited**

**Parul Jain**
**Company Secretary & Compliance Officer**

Date: April 29, 2021
Place: Mumbai

**Reliance Home Finance Limited**
CIN: L67190MH2008PLC183216
Regd. Office: The Ruby, 11th Floor, North-West Wing, Plot No. 29
Senapati Bapat Marg, Dadar (West), Mumbai 400 028
Tel.: +91 22 68388100, Fax: +91 22 68388360
E-mail: rhfl.investor@relianceada.com, Website: www.reliancehomefinance.com

---

## तळवलकर्स बेटर व्हॅल्यु फिटनेस लिमिटेड साठी स्वारस्याची अभिव्यक्ती (''ईओआय'') सादर करण्याची अंतिम तारखेची मुदतवाढ

बिझनेस स्टँडर्ड (संपूर्ण भारतात - इंग्रजी), नवशक्ति (महाराष्ट्रात - मराठी) मध्ये ०३ एप्रिल, २०२१ रोजी इन्सॉल्वन्सी अँड बँकरप्टसी (इन्सॉल्वन्सी रिझॉल्युशन प्रोसेस फॉर कॉर्पोरेट पर्सन्स) रेग्युलेशन्स, २०१६ च्या रेग्युलेशन ३६ ए (१) अंतर्गत तळवलकर्स बेटर व्हॅल्यु फिटनेस लिमिटेड साठी ईओआय निमंत्रणाकरिता फॉर्म जी प्रकाशित केला आहे. याद्वारे कळविण्यांत येते की, तळवलकर्स बेटर व्हॅल्यु फिटनेस लिमिटेड साठी ईओआय सादर करण्याकरिता अंतिम तारीख ३० एप्रिल, २०२१ पासून ३१ मे, २०२१ पर्यंत वाढवली आहे. सुधारित फॉर्म जी **https://www.ibbi.gov.in/resolution-plans** वरून किंवा वेबसाईट **http://www.talwalkars.in** वरून डाऊनलोड करता येईल किंवा **irptbvfl@kpmg.com** येथे ईमेल करून मिळवता येईल.

**सही/- श्री. सौरभ कुमार टिकमणी**
**आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी००५५९/२०१७-२०१८/१०९८९**
**दिनांक : ३० एप्रिल, २०२१** — **रिझॉल्युशन प्रोफेशनल**
**ठिकाण : मुंबई** — **तळवलकर्स बेटर व्हॅल्यु फिटनेस लिमिटेडच्या प्रकरणात**

---

**TATA**

**TATA STEEL LIMITED**
Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street,
Fort, Mumbai - 400 001, India
Tel.: +91 22 6665 8282 Email: cosec@tatasteel.com
Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

## सूचना

टाटा स्टील लिमिटेड ('कंपनी') च्या संचालक मंडळाची एक बैठक बुधवार, ५ मे, २०२१ रोजी इतर गोष्टींसह पुढील कामकाज करण्यासाठी होणार आहे.

१. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी लेखापरीक्षित अलिप्त आणि अलेखापरिक्षित एकत्रित वित्तीय विवरणे आणि निष्कर्ष विचारात घेऊन अभिलिखित करणे;
२. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षासाठी लेखापरिक्षित अलिप्त आणि एकत्रित वित्तीय विवरणे आणि निष्कर्ष विचारात घेऊन अभिलिखित करणे; आणि
३. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षासाठी देय असल्यास लाभांशाची शिफारस करणे.

सदर सूचना आणि वित्तीय निष्कर्ष कंपनीची वेबसाईट www.tatasteel.com वर तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड ची www.nseindia.com आणि बीएसई लिमिटेडची www.bseindia.com ह्या वेबसाईटस् वर सुद्धा उपलब्ध करून दिले जातील.

**टाटा स्टील लिमिटेड**
सही/-
**पार्वथीसम कांचिनाधम**
कंपनी सेक्रेटरी अँड
चिफ लिगल ऑफिसर (कॉर्पोरेट अँड कॉम्प्लायन्स)

२८ एप्रिल, २०२१
मुंबई

**TATA STEEL**

---

# Motilal Oswal Financial Services Ltd.

## Q4FY21 Results

### EXTRACT OF FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND YEAR ENDED MARCH 31, 2021

**Consolidated** (₹ in Crores, unless otherwise stated)

| Particulars | Quarter Ended* (Unaudited) March 31, 2021 | Quarter Ended* (Unaudited) March 31, 2020 | Year Ended (Audited) March 31, 2021 | Year Ended (Audited) March 31, 2020 |
|---|---|---|---|---|
| Total Income from Operations | 1,144 | 614 | 3,631 | 2,365 |
| Net Profit for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 545 | (227) | 1,545 | 285 |
| Net Profit for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 546 | (227) | 1,457 | 285 |
| Net Profit for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 461 | (237) | 1,198 | 215 |
| Total Comprehensive Income for the period [Comprising Profit for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 578 | (386) | 1,551 | 130 |
| Equity Share Capital (Face Value Re. 1 per Equity Share) | 15 | 15 | 15 | 15 |
| Earnings Per Share (of Re. 1/- each) (for continuing and discontinuing operations) | | | | |
| Basic: | 30.58 | (17.14) | 84.65 | 12.47 |
| Diluted: | 30.09 | (16.81) | 82.71 | 12.20 |

**Standalone** (₹ in Crores)

| Particulars | Quarter Ended* (Unaudited) March 31, 2021 | Quarter Ended* (Unaudited) March 31, 2020 | Year Ended (Audited) March 31, 2021 | Year Ended (Audited) March 31, 2020 |
|---|---|---|---|---|
| Total Income from Operations | 671 | 406 | 2,184 | 1,306 |
| Net Profit for the period (before Tax, Exceptional items) | 288 | (110) | 925 | 194 |
| Net Profit for the period before Tax (after Exceptional items) | 289 | (110) | 837 | 194 |
| Net Profit for the period after Tax (after Exceptional items) | 252 | (109) | 712 | 197 |

*The figures for the quarter ended March 31, 2021 and March 31, 2020 represents the balance between audited figures in respect of the full financial year and those published till the third quarter of the respective financial years.

**Notes:**

a) The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Financial Results are available on the Stock Exchange websites, www.nseindia.com, www.bseindia.com and the Company's website www.motilaloswalgroup.com.
b) Results for the quarter & year ended March 31, 2021 are in compliance with Indian Accounting Standards (IND AS) notified by the Ministry of Corporate Affairs.
c) The said financial results have been reviewed and recommended by the Audit Committee and subsequently approved by the Board of Directors at its Meeting held on April 29, 2021.
d) The Board of Directors at its Meeting held on April 29, 2021, have recommended final dividend of Rs. 5/- per equity share (on face value of Re. 1/- per equity share) for the financial year 2020-21 subject to approval of shareholders in ensuing Annual General Meeting.

For and on behalf of the Board of Directors of
**Motilal Oswal Financial Services Limited**

Sd/-
**Motilal Oswal**
**Managing Director & Chief Executive Officer**
**(DIN: 00024503)**

Place: Mumbai
Date: April 29, 2021

**Note:** Registration Nos.: INZ000158836 (BSE/NSE/MCX/NCDEX); CDSL and NSDL: IN-DP-16-2015; Research Analyst: INH000000412. AMFI: ARN -146822; Investment Adviser: INA000007100; Insurance Corporate Agent: CA0579, PMS: INP000006712

**BROKING & DISTRIBUTION | ASSET MANAGEMENT | HOME FINANCE | PRIVATE EQUITY**
**INSTITUTIONAL EQUITIES | INVESTMENT BANKING | PRIVATE WEALTH MANAGEMENT**

Motilal Oswal Financial Services Limited, Motilal Oswal Tower, Rahimtullah Sayani Road, Prabhadevi, Mumbai 400025.
CIN: L67190MH2005PLC153397, Tel: +91-22-7193 4200, Fax: +91-22-5036 2365, Website: www.motilaloswalgroup.com
Email Id: shareholders@motilaloswal.com

EQUITY EXPERTS FOR OVER 30 YEARS

MOTILAL OSWAL